मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शिवछत्रपतींचा 353 वा शिवराज्याभिषेक सोहळा रायगड किल्यावर उत्साहात साजरा

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री भरतशेठ गोगावले, योगेश कदम यांच्यासह पिंपरी चिंचवडचे महापौर रवि लांडगे उपस्थित

**पिंपरी | प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांचा तिथीप्रमाणे ३५३ वा शिवराज्याभिषेक सोहळा रायगड किल्यावर उत्साहात साजरा करण्यात आला. उपमुखमंत्री एकनाथ शिंदे, रोजगार हमी मंत्री भरतशेठ गोगावले, गृहराज्यमंत्री योगेश कदम, महापौर रवि लांडगे यांनी यावेळी ध्वज फडकवून छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन केले.





रायगड शिवराज्याभिषेक दिनोत्सव समिती आणि कोकणकडा मित्र मंडळ यांनी तिथीप्रमाणे आयोजित केलेल्या या शिवराज्यभिषेक सोहळ्यासाठी यावेळी रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल आणि यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

> छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवराज्याभिषेक हा केवळ ऐतिहासिक सोहळा नसून स्वराज्य, सुशासन आणि लोककल्याणकारी राज्यकारभाराचा प्रेरणादायी आदर्श आहे. रायगड ही प्रत्येक शिवभक्तासाठी प्रेरणास्थळी असून, येथे येऊन शिवरायांच्या कार्याला अभिवादन करण्याचे भाग्य लाभणे ही अभिमानाची बाब आहे. शिवरायांनी दिलेला शौर्य, पराक्रम, न्याय आणि सर्वसमावेशक प्रशासनाचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी आपली आहे.
>
> \- रवि लांडगे, महापौर,
> पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# पिंपरी-चिंचवडकरांना भामा आसखेडचे 167 एमएलडी पाणी नवीन वर्षात मिळणार

## तीर्थक्षेत्र देहू येथील इंद्रायणी नदीपात्राच्या 25 फूट खालून जलवाहिनी टाकण्याचे आव्हानात्मक काम पाऊस पडण्यापूर्वी यशस्वीरित्या पूर्ण.

**पिंपरी | प्रतिनिधी**

भामा आसखेड पाणी योजनेच्या भूमिगत जलवाहिनीचे रखडलेल्या उर्वरित ३० टक्के कामासाठी दोन ठेकेदारांची नियुक्ती केल्यानंतर कामाला गती मिळाली आहे. दीड महिन्यात दहा टक्के काम झाले असून एकूण ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. फेब्रुवारी २०२७ पर्यंत कामाची मुदत असली, तरी डिसेंबरअखेर काम पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे प्रशासनाने सांगितले. डिसेंबरअखेर काम पूर्ण झाल्यास नवीन वर्षात शहराला अतिरिक्त १६७ दशलक्ष लीटर (एमएलडी) स्वच्छ पाणी उपलब्ध होणार आहे.



खेड तालुक्यातील भामा आसखेड धरणातून शहरासाठी १६७ दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणी बंदिस्त जलवाहिनीद्वारे चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्रात आणण्यात येणार आहे. चारवेळा मुदतवाढ आणि सूचना देऊनही संबंधित ठेकेदाराने काम पूर्ण केले नाही. हा प्रकल्प नोव्हेंबर २०२४ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित होते. मुदतवाढ संपूनही ३० टक्के काम शिल्लक राहिल्याने महापालिकेने ठेकेदाराला बडतर्फ केले. दोन नवीन ठेकेदारांची नियुक्ती केली. भामा आसखेड धरणापासून नवलाख उंब्रे येथील ब्रेक प्रेशर टाकीपर्यंत १७०० मिलीमीटर व्यासाची भूमिगत जलवाहिनीचे उर्वरित आणि ब्रेक प्रेशर टाकीपासून तळवडे व देहूपर्यंतच्या १४०० मिलिमीटर जलवाहिनीचे उर्वरित काम वेगात सुरू आहे. मागील दीड महिन्यात दहा टक्के काम पूर्ण झाले आहे.

फेब्रुवारी २०२७ पर्यंत कामाची मुदत असली, तरी डिसेंबरअखेर काम पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे प्रशासनाने सांगितले. डिसेंबरअखेर काम पूर्ण झाल्यास नवीन वर्षात शहराला अतिरिक्त १६७ दशलक्ष लीटर (एमएलडी) स्वच्छ पाणी उपलब्ध होणार आहे. भामा आसखेड जलवाहिनीचे काम वेगात सुरू आहे. रखडलेल्या ३० पैकी दहा टक्के काम पूर्ण झाले आहे. या कामाचा दर पंधरा दिवसांनी आढावा घेतला जातो. फेब्रुवारीपर्यंत कामाची मुदत असून मुदतीपूर्वी काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. जलवाहिनीचे काम पूर्ण झाल्यानंतर शहराला अतिरिक्त १६७ दशलक्ष लीटर (एमएलडी) स्वच्छ पाणी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे पाण्याची समस्या कमी होईल, असे पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी सांगितले.

### इंद्रायणी नदीच्या खालून जलवाहिनी

» तीर्थ क्षेत्र देहू येथील इंद्रायणी नदीपात्राच्या खालून जलवाहिनी टाकण्यात आली आहे. नदीतील पाण्याच्या पातळीपासून २५ फूट खाली मातीचा भराव टाकण्यात आला. त्यानंतर जलवाहिनी टाकण्यात आली. पाऊस पडण्यापूर्वी नदीपात्रातील काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे उर्वरित कामाला कोणतीही अडचण येणार नाही, असे पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी सांगितले.

### साडे वर्षांपासून दिवसाआड पाणीपुरवठा

» सर्वांना मुबलक व पुरेसे पाणी मिळण्यासाठी महापालिकेने नोव्हेंबर २०१९ मध्ये काही दिवसांसाठी एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरु केला होता. काही दिवसांसाठीचा एक दिवसाआडचा पाणीपुरवठा पुढे कायम ठेवण्यात आला आहे. साडे सहा वर्षे पूर्ण झाली, तरी एक दिवसाआडच पाणीपुरवठा होत आहे. वाढीव पाणी मिळत नाही, तोपर्यंत दररोज पाणीपुरवठा करणे शक्य नसल्याचे प्रशासन सांगत आहे..

# पिंपरी-चिंचवडमध्ये ‘अर्बन स्ट्रीट डिझाईन’ला सर्वोच्च न्यायालयाचे बळ

## हरित सेतू प्रकल्पांतर्गत रुंद पदपथ व सायकल ट्रॅक विकसित; शहराला वॉकेबल आणि ग्रीन सिटी बनवण्याचा प्रयत्न

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरात अर्बन स्ट्रीट डिजाईन तसेच, हरित सेतू प्रकल्पाअंतर्गत शहरातील मुख्य रस्त्यांवर प्रशस्त पदपथ व सायकल ट्रॅक बनवण्यात आले आहेत. हे काम सुरू करण्यापूर्वी नागरिक तसेच अनेक सामाजिक संघटनांकडून त्याला विरोध करण्यात येत होता. कोट्यवधी रुपये खर्च करून रस्ते अरुंद केले जात असल्याची ओरड होत होती; मात्र कालांतराने या प्रकल्पास नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. पदपथावर चालण्यासोबत सायकल लावण्यास पसंती दिली जात आहे. नागरिक तसेच सायकलस्वारांसाठी स्वतंत्र व सुरक्षित मार्ग असावेत, या महापालिकेच्या भूमिकेवर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब करत एक प्रकारे पाठबळ दिले आहे.

महापालिकेकडून शहरातील मुख्य रस्ते अरुंद करून पदपथ रुंद केले जात असल्याची ओरड पूर्वी केली जात होती. प्रत्यक्षात अर्बन स्ट्रीट डिझाईनअंतर्गत काम झाल्यानंतर नागरिकांचे मत बदलत असल्याचे दिसून येत आहे. प्रशस्त पदपथ व सायकल ट्रॅक तयार झाल्यानंतर नागरिकांकडून त्याचे स्वागत केले जात आहे. अर्बन स्ट्रीटच्या प्रशस्त, स्वच्छ आणि आकर्षक पदपथावर नागरिक सुरक्षितपणे चालण्याचा आनंद घेत आहेत. तसेच, सायकल ट्रॅकवर सायकल चालण्याचा आनंद सहकुटुंब घेत असल्याचे अनेक ठिकाणी दिसत आहे. अनेक जण पदपथावरील कठड्यावर गप्पा मारत बसलेले दिसतात. आकर्षक पथदिवे, रचनेमुळे पदपथ आकर्षणाचा विषय ठरत आहे. तर, काही जण मोबाईलवर छायाचित्र टिपताना दिसतात. तर, काही मंडळी रिल्ससाठी व्हिडिओ चित्रीकरण करतात. या आकर्षक पदपथामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडत आहे. महापालिका प्रशासनाच्या या भूमिकेवर शिक्कामोर्तब करून, सर्वोच्च न्यायालयानेही पाठबळ दिले आहे.



### सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

**» पाच वर्षांचा मुलगा शाळेत जात असताना रस्ते अपघातात ठार झाल्याने एका पित्याने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. त्या प्रकरणात सुनावणी 19 जूनला झाली. न्यायालयाने निर्णय देताना म्हटले की, पदपथावर चालण्याचा अधिकार हा भारतीय संविधानाने दिलेला मूलभूत अधिकार आहे. हा अधिकार संविधानाच्या अनुच्छेद 19 (1) (डी) (देशभर मुक्तपणे फिरण्याचा अधिकार) आणि अनुच्छेद 21 (जीवनाचा अधिकार) यांचा अविभाज्य भाग आहे. शहरातील रस्ते केवळ वाहनांसाठी नसून, ते सर्व नागरिकांसाठी प्रामुख्याने पादचारी व सायकलस्वारांसाठी आहेत. नागरिकांना तसेच, सायकस्वारांना सुरक्षित असे स्वतंत्र मार्ग असावेत, असे आदेश न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत. चालण्याचा मूलभूत अधिकारासाठी स्वतंत्र कायदा करण्याचे आदेश केंद्र सरकारला दिले आहेत. पदपथ अधिकाराचा भंग झाल्यास नागरिकांना संविधान व इतर कायद्यांनुसार नुकसान भरपाई व इतर कायदेशीर उपाय मागण्याचा अधिकार आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.**

### पदपथ नागरिकांसाठी अधिक सुरक्षित

**» पारंपरिक पद्धतीने रस्ते बनवताना केवळ वाहनांचा विचार केला जातो. मात्र, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अर्बन स्ट्रीट डिजाईनअंतर्गत रस्त्यांचे पुनर्रचना करून, कंप्लीट स्ट्रीट्स ही संकल्पना राबवली जात आहे. पादचारी स्वायकलस्वारांसाठी सुरक्षित स्वतंत्र मार्ग तयार करण्यात येत आहेत. प्रमुख रस्त्यांवर पादचाऱ्यांसाठी अडथळा नसलेले, सलग व रुंद पदपथ विकसित केले जात आहेत. खासगी वाहनांचा वापर कमी व्हावा, यासाठी स्वतंत्र व सुरक्षित सायकल कॉरिडॉरची निर्मिती केली जात आहे. पदपथांच्या बाजूला सावलीसाठी वृक्षारोपण, बसण्यासाठी दगडी बाकडे, लहान मुलांसाठी खेळण्याची जागा व पथदिव्यांची सोय करून रस्त्यांचे रूपांतर जिवंत सार्वजनिक ठिकाणी केले जात आहे. पादचाऱ्यांना रस्ता ओलांडणे सोपे जावे म्हणून टेबलटॉप क्रॉसिंग व गतिरोधकांचे डिझाइन सुधारण्यात येत आहे, असे अधिकाऱ्यांचे मत आहे.**

# विजेच्या लंपडावामुळे चिखलीकर त्रस्त; जुनी भूमिगत केबल बदलण्याची नागरिकांची मागणी

## मोरे वस्ती, पिंगळे रोड व सोनवणे वस्ती परिसरात महिनाभरात चार वेळा केबल बिघाड; तात्पुरत्या दुरुस्तीमुळे समस्या कायम

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली, परिसरातील पिंगळेरोड, सोनवणेवस्ती परिसरात सातत्याने विजेचा लंपडाव सुरु आहे. तर मोरे वस्ती येथील राजगड पार्क परिसरातील गल्ली क्र. पाचमधील केबलमध्ये गुरुवारी (ता.२५) पुन्हा तांत्रिक बिघाड होऊन वीज पुरवठा खंडित झाला. गेल्या महिनाभरात मोरे वस्ती परिसरात तब्बल चार वेळा भूमिगत वीज केबलमध्ये बिघाड होऊन वीज पुरवठा खंडित झाला आहे.

मोरेवस्ती येथील अष्टविनायक चौक परिसरात १३ जून रोजी सुमारे १४ तास पुरवठा खंडित झाला. त्यानंतर त्याच ठिकाणी लगेचच दोनच दिवसांनी केबलमध्ये बिघाड होऊन १५ तास वीज पुरवठा खंडित झाला. त्यानंतर आठ दिवसांनी पुन्हा राजगड पार्क येथे केबलमध्ये बिघाड होऊन १२ तासांपेक्षा अधिक काळ वीज पुरवठा खंडित झाला. त्यानंतर गुरुवारी (ता.२५) पुन्हा राजगड पार्क परिसरातील गल्ली क्र. पाच येथील केबलमध्ये बिघाड होऊन वीज पुरवठा खंडित झाला. केबलमध्ये बिघाड होण्याबरोबरच मोरे वस्ती, चिखली आदी परिसरात दररोजच अनेक वेळा विजेचा लपंडाव सुरू असतो. त्यामुळे विजेची घरगुती उपकरणांमध्ये बिघाड होऊन जळाल्याच्या घटना घडत आहेत. या परिसरात केबलमध्ये वारंवार बिघाड होत असल्याने केवळ दुरुस्ती करण्याऐवजी संपूर्ण जुनी केबल बदलणे आवश्यक बनले आहे. मात्र, जुन्या केबल्स बदलण्याऐवजी महावितरणकडून तात्पुरती दुरुस्ती केली जात असल्याने विजेची समस्या कायम असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.



### कायमस्वरुपी तोडगा हवा

**» एकदा केबलमध्ये बिघाड झाल्यानंतर तो शोधून दुरुस्त करेपर्यंत किमान १२ ते १५ तास वीज गायब होते. त्यामुळे दुकानदार, छोटे उद्योजक यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. त्याचबरोबर नागरिकांनाही रात्र अंधारात काढावी लागते. स्वयंपाकाची घरगुती उपकरणे, पाणीपुरवठा इत्यादी दैनंदिन कामे अडून पडतात. वारंवार होणाऱ्या खंडित वीज पुरवठ्यावर उपाययोजना करण्यासाठी केबल बदलून कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी नागरिकांची मागणी आहे.**

**“ प्रभाग एक मध्ये सातत्याने विजेची समस्या येते. त्यामुळे महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांनी कायमस्वरूपी तोडगा काढून समस्या मार्गी लावावी. ज्यामुळे नागरिकांना सातत्याने होणारा विजेच्या लंपडावाच्या त्रासातून सूटका मिळेल. याबाबत माहिती घेऊन येथील वीज समस्येवर कायमस्वरूपी तोडणे काढण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील.**

**- विश्वनाथ लहाने, कार्यकारी अभियंता, भोसरी विभाग, महावितरण**

# महापालिकेचा मोठा निर्णय; आता ग्राहकांसाठी येणार नवा नियम

## टँकर पुरवठा पारदर्शक करण्यासाठी पुणे महापालिकेकडून तातडीने 'स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर' (SOP) लागू करण्याचे निर्देश.

**पुणे | प्रतिनिधी**

वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा अधिक पारदर्शक, सुरक्षित होण्यासाठी महापालिकेने तातडीने सर्वसमावेशक कार्यप्रणाली म्हणजे स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर (एसओपी) तयार करावी, असे आदेश स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिले आहेत. शहरातील दिवसाआड पाणीकपातीमुळे पाण्याच्या टँकरची मागणी वाढली असून अनेक भागात टँकर व्यावसायिक मनमानी शुल्क आकारतात.

तसेच वेळेवर पाणीही मिळत नसल्याच्या तक्रारी लक्षणीय प्रमाणात वाढले असल्याच्या नगरसेवकांच्या तक्रारी आहेत. ही बाब लक्षात घेऊन ही नियमावली करण्याचे आदेश दिले आहेत. समितीच्या बैठकीत सदस्यांनी पाण्याचा प्रश्न उपस्थित केल्यानंतर प्रशासनाकडून टँकर पुरवठ्याची सद्यस्थिती, महापालिका व खासगी टँकरची संख्या, टँकर भरणा केंद्रांची क्षमता, अधिकृत दर, अपघातांची आकडेवारी, चालकांची पात्रता, जीपीएस यंत्रणा, ऑनलाइन बुकिंग व्यवस्था, पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी आणि नियंत्रण कक्षाची माहिती मागविण्यात आली.

स्थायी समितीने कार्यप्रणालीमध्ये अधिकृत दरपत्रक जाहीर करणे, प्रत्येक टँकरवर दरफलक लावणे, सर्व टँकरमध्ये जीपीएस बसविणे, नागरिकांना मोबाईल ॲपद्वारे टँकर ट्रॅकिंगची सुविधा उपलब्ध करून देणे, ऑनलाइन व हेल्पलाईनद्वारे पारदर्शक बुकिंग व्यवस्था सुरू करणे, तसेच पहिली मागणी – पहिला पुरवठा हे तत्त्व लागू करण्याचे निर्देश दिले आहेत

या शिवाय,टँकरच्या सुरक्षिततेसाठी वेगमर्यादा निश्चित करणे, शाळा व रुग्णालय परिसरात विशेष नियम लागू करणे, चालकांचे नियमित प्रशिक्षण, वैद्यकीय तपासणी, मद्यपान व अमली पदार्थ चाचणी तसेच परावर्तित पट्ट्या, सुरक्षा दिवे, ब्लाइंड स्पॉट मिरर, रिव्हर्स कॅमेरे आणि अलार्म प्रणाली अनिवार्य करण्याच्याही सूचना करण्यात आल्या आहेत.

पावसाने ओढ दिल्याने भूजसाठाही घटलेला असून विहिरींचे पाणी कमी झाले आहे. तसेच बोअरवेलही आटल्या आहेत. त्यामुळे, अशा ठिकाणांहून दिल्या जाणाऱ्या प्रत्येक टँकरमधील पाण्याच्या नमुन्याची नियमित तपासणी, क्लोरीनेशन, दूषित पाणीपुरवठा करणाऱ्यांवर कठोर कारवाई, सर्व खासगी टँकरची नोंदणी, वार्षिक फिटनेस प्रमाणपत्र आणि नियमभंग करणाऱ्यांची काळी यादी तयार करण्याचे निर्देश देण्यात आले.



### टँकर सुरक्षिततेसाठी कठोर नियम

» टँकरमुळे होणारे अपघात टाळण्यासाठी महापालिका सुरक्षिततेवर विशेष भर देणार आहे. चालकांचे नियमित प्रशिक्षण, वैद्यकीय तपासणी, मद्य व अमली पदार्थ चाचणी बंधनकारक केली जाणार आहे. प्रत्येक टँकरमध्ये परावर्तित पट्ट्या, सुरक्षा दिवे, ब्लाइंड स्पॉट मिरर, रिव्हर्स कॅमेरा आणि अलार्म प्रणाली बसविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शाळा, रुग्णालय परिसरात वेगमर्यादा लागू करून सुरक्षित वाहतुकीची अंमलबजावणी केली जाणार असून नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे.

### एसओपीमध्ये काय असणार?

» महापालिकेच्या नव्या स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर (एसओपी) मध्ये टँकर पाणीपुरवठा अधिक पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्यावर भर दिला जाणार आहे. प्रत्येक टँकरवर अधिकृत दरपत्रक लावणे, जीपीएस प्रणाली अनिवार्य करणे, मोबाईल ॲपद्वारे टँकरचे थेट ट्रॅकिंग, ऑनलाइन आणि हेल्पलाईनद्वारे बुकिंग तसेच "पहिली मागणी–पहिला पुरवठा" हे तत्त्व लागू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे मनमानी दर आकारणी आणि विलंबाच्या तक्रारी कमी होऊन नागरिकांना अधिक विश्वासार्ह सेवा मिळण्याची अपेक्षा आहे.

### पाण्याच्या गुणवत्तेवर विशेष लक्ष

» पाणीटंचाईच्या काळात नागरिकांना स्वच्छ आणि सुरक्षित पाणी मिळावे यासाठी प्रत्येक टँकरमधील पाण्याची नियमित तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. क्लोरीनेशन, पाण्याचे नमुने तपासणे, दूषित पाणीपुरवठा करणाऱ्यांवर कठोर कारवाई, सर्व खासगी टँकरची नोंदणी आणि वार्षिक फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य केले जाणार आहे. याशिवाय २४x७ तक्रार निवारण हेल्पलाईन सुरू करून २४ तासांत तक्रारींचे निराकरण, तसेच रुग्णालये, शाळा, पोलीस ठाणी आणि अग्निशमन केंद्रांना प्राधान्याने पाणीपुरवठा करण्याची व्यवस्था केली जाणार आहे.

# पालखी मार्गावर पीएमआरडीएचा हातोडा! तब्बल 70 अनधिकृत होर्डिंग्ज केले भुईसपाट

## हवेली, दौंड आणि पुरंदर तालुक्यांतील पालखी मार्गावरील 123 होर्डिंग्जचे सर्वेक्षण; 70 बेकायदेशीर होर्डिंग्ज अखेर निष्कासित.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) पालखी मार्गावरील अनधिकृत होर्डिंग्जवर मोठी कारवाई केली आहे. संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या आषाढी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई केली. आतापर्यंत ७० अनधिकृत होर्डिंग्ज बांधकाम विभागाने भुईसपाट केली आहेत. पालखी सोहळा निर्विघ्न पार पडावा आणि वारकऱ्यांचा प्रवास सुरक्षित व्हावा,

या उद्देशाने पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी मे महिन्यातच या मार्गांवरील होर्डिंग्जचे सर्वेक्षण करून अनधिकृत होर्डिंग्ज निष्कासित करण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. त्यानुसार बांधकाम विभागाने पीएमआरडीएच्या हद्दीतील हवेली, दौंड आणि पुरंदर तालुक्यांतील पालखी मार्गांवरील सुमारे १२३ होर्डिंग्जचे सविस्तर सर्वेक्षण केले. त्यानंतर बेकायदेशीरपणे उभारलेली तब्बल ७० अनधिकृत होर्डिंग्ज हटविण्यात आली. काही अनधिकृत होर्डिंगधारकांनी आपली होर्डिंग्ज स्वतःहून काढून घेतली आहेत

केवळ मुख्य पालखी मार्गच नव्हे, तर पीएमआरडीए हद्दीतील पुणे जिल्ह्यातील इतर प्रमुख मार्गांवरील आणि मोक्याच्या ठिकाणांवरील होर्डिंग्जचेही सर्वेक्षण सुरू आहे. त्यामध्ये अनधिकृत अथवा विनापरवाना उभारलेली होर्डिंग्ज आढळल्यास त्यांच्यावरही कठोर कारवाई करणार असल्याचा इशारा सहआयुक्त हिंमत खराडे यांनी दिला. व्यावसायिक आणि जाहिरातदारांनी पीएमआरडीएची रीतसर परवानगी घेऊनच होर्डिंग्ज उभारावीत; अन्यथा प्रशासनाकडून थेट निष्कासनाची कारवाई करण्यात येईल, असा सज्जड इशाराही पीएमआरडीए प्रशासनाने दिला आहे.



> "पीएमआरडीएच्या हद्दीत कुठेही होर्डिंग्ज उभारताना प्रशासनाची रीतसर परवानगी घेणे बंधनकारक आहे. नियमबाह्य आणि विनापरवाना उभारलेल्या होर्डिंग्जवर कोणतीही गय न करता थेट कारवाई केली जाईल."
> - डॉ. अभिजित चौधरी, आयुक्त, पीएमआरडीए

# युवकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्रिसूत्री : मुख्यमंत्र्यांची घोषणा

## छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेतर्फे (सारथी) स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा पुण्यात भव्य सत्कार.



**पुणे | प्रतिनिधी**

मराठा समाजातील आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागे राहिलेल्या घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य शासन खंबीरपणे पाठीशी उभे आहे. समाजातील 'नाही रे' वर्ग आणि मागास युवकांना वर आणण्यासाठी शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगार या त्रिसूत्रीवर आधारित धोरण राबविण्यात येत असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) च्या वतीने गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित यूपीएससी, एमपीएससी, तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांच्या सन्मान सोहळ्यात मुख्यमंत्री बोलत होते. या वेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, महापौर मंजुषा नागपुरे, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह, मनपा आयुक्त नवलकिशोर राम, पोलीस आयुक्त अमितेश कुमार, नियोजन विभागाच्या सचिव शैला ए., विभागीय आयुक्त शीतल तेली उगले, सारथीचे अध्यक्ष अजित निंबाळकर, व्यवस्थापकीय संचालक महेश पाटील उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, की मराठा समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी स्थापन झालेल्या सारथी संस्थेने उल्लेखनीय कार्य केले असून, आतापर्यंत युपीएससी, एमपीएससी आणि बँकिंग क्षेत्रात शेकडो तरुण यशस्वी झाले आहेत. १३ हजारांहून अधिक युवकांना रोजगारक्षम बनवण्यात आले आहे. युवकांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन तंत्रज्ञान आणि संगणक तंत्रज्ञानासारख्या आधुनिक कौशल्यांकडे वळावे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सारथी ही केवळ योजना नसून सामाजिक परिवर्तनाची चळवळ असल्याचे गौरवोद्गार काढले.

### आधुनिक कौशल्यांवर भर

» युवकांनी बदलत्या काळानुसार कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), ड्रोन तंत्रज्ञान, संगणक तंत्रज्ञान आणि डिजिटल कौशल्ये आत्मसात करावीत, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. भविष्यातील रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन पारंपरिक शिक्षणाबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कौशल्य विकास, शिक्षण आणि रोजगार या त्रिसूत्रीच्या माध्यमातून मराठा समाजातील युवकांना सक्षम करून त्यांना राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनविण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### सारथीची आतापर्यंतची कामगिरी

» सारथी संस्थेच्या माध्यमातून मराठा समाजातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, कौशल्य विकास आणि रोजगारासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. आतापर्यंत यूपीएससी, एमपीएससी, बँकिंग आणि इतर स्पर्धा परीक्षांमध्ये शेकडो विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. तसेच १३ हजारांहून अधिक युवकांना रोजगारक्षम बनविण्यात आले आहे. आधुनिक कौशल्य प्रशिक्षणामुळे राज्यातील अनेक युवकांना नवीन संधी उपलब्ध झाल्या असून, सारथी सामाजिक आणि शैक्षणिक परिवर्तनाचे प्रभावी व्यासपीठ ठरत आहे.

### १,३६० कोटींच्या प्रकल्पाला मंजुरी

» सारथी संस्थेच्या विस्तारासाठी राज्य शासनाने १,३६० कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. या निधीतून राज्यभर विभागीय कार्यालये, विद्यार्थ्यांसाठी आधुनिक वसतिगृहे आणि आवश्यक पायाभूत सुविधा उभारल्या जाणार आहेत. या प्रकल्पामुळे ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन, निवास आणि प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध होणार आहे. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही योजना मोठा आधार ठरणार आहे.

# शिरूरमध्ये मतदार यादीचे विशेष पुनरीक्षण सुरू; बीएलओ घरोघरी माहिती संकलित करणार

## SIR कार्यक्रमांतर्गत मतदार यादी अद्ययावत; अंतिम यादी 7 ऑक्टोबर 2026 रोजी प्रसिद्ध होणार



**पुणे | प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर १९८ शिरूर विधानसभा मतदारसंघातील शिरूर शहरातील सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक २३ जून रोजी झाली. शिरूर नगरपरिषदेच्या प्रशासकीय इमारतीतील रसिकभाऊ धारीवाल सभागृहात झालेल्या या बैठकीच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा शिरूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी प्रीतम पाटील होते.

या वेळी प्रीतम पाटील यांनी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाची माहिती दिली. त्यांच्या माहितीनुसार, २० जून ते २९ जून या कालावधीत बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) यांचे प्रशिक्षण पूर्ण होणार असून, ३० जून ते २९ जुलै या कालावधीत बीएलओ घरोघरी जाऊन मतदारांची माहिती संकलित करतील. आवश्यक प्रक्रिया पूर्ण न केल्यास मतदाराचे नाव यादीतून वगळले जाण्याची शक्यता असल्याची माहितीही या वेळी देण्यात आली. २००२ च्या मतदार यादीत नाव असलेल्या मतदारांना केवळ मॅपिंग फॉर्म भरावा लागणार असून, त्यांना इतर कोणत्याही कागदपत्रांची आवश्यकता भासणार नाही.

१ जुलै १९८७ पूर्वी जन्म झालेल्या आणि मतदार यादीत नाव नसलेल्या व्यक्तींना जन्मतारीख व जन्मस्थळाचा पुरावा म्हणून निवडणूक आयोगाने मान्य केलेल्या ११ पैकी कोणतेही एक कागदपत्र सादर करावे लागेल. तसेच, १ जुलै १९८७ ते २ डिसेंबर २००४ या कालावधीत जन्मलेल्या व्यक्तींना स्वतःचा किंवा आई अथवा वडिलांपैकी एकाचा जन्माचा पुरावा सादर करावा लागणार आहे.

५ ऑगस्ट २०२६ रोजी कच्ची मतदार यादी प्रसिद्ध होणार असून, ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावा व हरकती दाखल करता येणार आहेत. अंतिम मतदार यादी ७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. या वेळी प्रीतम पाटील यांनी सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना SIR मोहीम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. तसेच, एकाही पात्र मतदाराचे नाव यादीतून वगळले जाणार नाही, याची दक्षता घेऊन नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती करण्याचे आवाहन करण्यात आले.

### मतदार नोंदणीसाठी मान्य ११ कागदपत्रे

» जन्म दाखला, पासपोर्ट, जात प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, दहावी किंवा बारावीचे प्रमाणपत्र, कुटुंब नोंदवही, सरकारी जमीन अथवा घराचे कागदपत्र, सरकारी ओळखपत्र, पेन्शन आदेश, वनहक्क प्रमाणपत्र तसेच १ जुलै १९८७ पूर्वीचे बँक किंवा पोस्टाचे पासबुक ही कागदपत्रे ग्राह्य धरण्यात येणार आहेत.